आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० जून २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री पदाचा कार्यभार नरेंद्र मोदी यांनी तिसऱ्यांदा स्वीकारला, सर्वप्रथम किसान सन्मान निधीचा सतरावा हप्ता केला जारी.

- देशातल्या १३ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

- शेअर बाजारात तेजी/ मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने प्रथमच ओलांडला ७७ हजाराचा टप्पा

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताचा पाकिस्तानवर सहा धावांनी विजय

- जम्मू-काश्मीरमधे काल संध्याकाळी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १० जणांचा मृत्यू ,तर ३३ जण जखमी

**आणि**

- मुंबई आणि महाराष्ट्रात मोसमी पाऊस दाखल

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कार्यभार स्वीकारला. हा पदभार तिसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७वा हप्ता जारी केला. या २० हजार कोटी रुपयांच्या निधीचा फायदा ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हे नवं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

दरम्यान, कालच्या शपथविधीनंतर नवनियुक्त मंत्रिमंडळाची पहिली बैठक आज संध्याकाळी होण्याची शक्यता आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१० जून २०२४ - सोमवार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह रालोआ मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा काल राष्ट्रपती भवनात झाला. यावेळी ३० कॅबिनेट, पाच राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार आणि ३७ राज्यमंत्र्यांना राष्ट्रपतींनी पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. भाजपाचे ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, एस. जयशंकर, पीयूष गोयल या मंत्र्यांनी नव्या रालोआ मंत्रिमंडळात पुुन्हा एकदा शपथ घेतली आहे. तर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी नड्डा, राजीव रंजन सिंह, चिराग पासवान, अन्नपूर्णा देवी या नेत्यांचा नव्या मंत्रिमंडळात समावेश झाला आहे.

मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर, एचएएम पक्षाचे नेते आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री जितनराम मांझी, जेडीएसचे नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी या माजी मुख्यमंत्र्यांनीही कॅबिनेट मंत्रीपदाची शपथ घेतली आहे.

राव इंद्रजित सिंह, जितेंद्र सिंह आणि अर्जुन राम मेघवाल या स्वतंत्र प्रभार असलेल्या राज्यमंत्र्यांनी नव्या मंत्रिमंडळात पुन्हा एकदा मंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारली आहे. तर शिवसेनेचे प्रतापराव जाधव आणि रालोदचे जयंत चौधरी या दोन मंत्र्यांनी पहिल्यांदाच राज्यमंत्री स्वतंत्र प्रभार म्हणून शपथ घेतली.

श्रीपाद नाईक, कृष्ण पाल, रामदास आठवले, नित्यानंद राय, बी.एल राय या राज्यमंत्र्यांचं मंत्रिमंडळातलं स्थान कायम राहिलं आहे. तर जितिन प्रसाद, पेम्मासानी चंद्रशेखर, रवनित सिंह, सुरेश गोपी, रक्षा खडसे आणि मुरलीधऱ मोहोळ या खासदारांना पहिल्यांदाच राज्यमंत्री म्हणून जबाबदारी मिळाली आहे.

<><><><><>

रालोआ सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातल्या अनेक मंत्र्यांना तिसऱ्या कार्यकाळात संधी मिळाली नाही. यात मंत्री अर्जुन मुंडा, नारायण राणे, महेंद्रनाथ सिंह, पुरुषोत्तम रुपाला, अनुराग ठाकुर या मंत्र्यांचा समावेश आहे. तसंच राज्यमंत्री प्रल्हाद सिंह पटेल, अश्विनी कुमार चौबे, व्ही. के. सिंह, स्वाध्वी निरंजन ज्योती यांनाही नव्या मंत्रिमंडळात स्थान मिळालं नाही.

<><><><><>

देशातल्या १३ विधानसभा मतदारसंघातल्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगानं जाहीर केला आहे. त्यात पश्चिम बंगालमधले ४ मतदारसंघ, हिमाचल प्रदेशातले ३, उत्तराखंडातले २ तसंच बिहार, तमिळनाडू, मध्य प्रदेश आणि पंजाबमधल्या प्रत्येकी एका मतदारसंघाचा समावेश आहे. या पोटनिवडणुकांसाठी येत्या १० जुलैला मतदान होईल, तर १३ जुलैला मतमोजणी होईल.

<><><><><>

ओडिशा भाजपा विधीमंडळ पक्षाच्या नेत्याच्या निवडीसाठी भाजपानं पक्ष निरीक्षक म्हणून केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि भूपेंद्र यादव यांची नियुक्ती केली आहे. भाजपा विधीमंडळ पक्षाची बैठक उद्या होण्याची शक्यता आहे, तर ओडिशाच्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी भुवनेश्वरच्या जनता मैदानात परवा, म्हणजेच बुधवारी होणार आहे.

<><><><><>

भारतीय शेअर बाजारांमधे आज तेजीचं वातावरण असून आज सकाळच्या सुरुवातीच्या सत्रात मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकाने प्रथमच ७७ हजाराचा टप्पा ओलांडला. कालच्या तुलनेत ३८६ अंकाची उसळी घेत सेन्सेक्स ७७ हजारा चा विक्रमी उच्चांक गाठला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ही १२२ अंकांनी वाढून २३ हजार ४१२ अंकावर पोहोचला. सलग चौथ्या सत्रात शेअर बाजारातले निर्देशांक वधारले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने जीडीपी वाढीचा दर ७ पूर्णांक २ दशांश राहील, असा अंदाज वर्तवला, तसंच परकीय गुंतवणुकीचा ओघही वाढला या पार्श्वभूमीवर ही तेजी पहायला मिळत आहे.

**<><><><><>**

टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत काल भारताने चुरशीच्या सामन्यात पाकिस्तानवर सहा धावांनी विजय मिळवला. न्यूयॉर्कच्या नासॉ स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने १९ षटकांमध्ये सर्वबाद ११९ धावा केल्या. ऋषभ पंतनं ४२, तर अक्षर पटेलनं २० धावांची खेळी केली. प्रत्युत्तरादाखल मैदानात उतरलेल्या पाकिस्तानच्या संघाला निर्धारित २० षटकांमध्ये ७ गड्यांच्या मोबदल्यात फक्त ११३ धावाच करता आल्या. जसप्रीत बुमराहनं तीन बळी घेतले. हार्दिक पंड्यानं दोन, तर अक्षर पटेल आणि अर्शदीप सिंह यांनी प्रत्येकी एका गड्याला तंबूत धाडलं. जसप्रीत बुमराहला सामनावीर म्हणून गौरवण्यात आलं.

**<><><><><>**

पॅरिस इथं सुरू असलेल्या फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत काल स्पेनच्या कार्लोस अल्काराज गरफिया याने आपलं पहिलं विजेतेपद पटकावलं. त्याने जर्मनीच्या अलेक्झांडर झ्वेरेव याचा ६-३, २-६, ५-७, ६-१, ६-२ अशा

गुणफरकाने पराभव केला. या विजयामुळे, अल्काराज, वयाच्या २१ व्या वर्षी, १९९० च्या दशकात जन्मलेल्या अन्य खेळाडूपेक्षा सर्वात जास्त ग्रँड स्लॅम विजेतेपदं पटकावणारा सर्वात तरुण आणि एकमेव खेळाडू ठरला आहे. तसच खुल्या टेनिस स्पर्धेत महत्वाच्या तीन मैदानांवर विजेतेपद मिळवणारा जगातला दुसरा टेनिसपटू ठरला आहे.

**<><><><><>**

भारतीय टेनिसपटू सुमित नागल याने जर्मनीत झालेल्या हेलबॉन निकारकप चॅलेंजर स्पर्धेचं अजिंक्यपद पटकावलं आहे. पुरुष एकेरीच्या काल झालेल्या अंतिम सामन्यात त्यानं स्वित्झर्लंडच्या अलेक्झांडर रिश्वर्ड याचा ६-१, ६-७, ६-३ असा पराभव केला. सुमितचं हे सहावं एटीपी चॅलेंजर जेतेपद आहे. या विजयासोबतच सुमित आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्र ठरला आहे. तसंच जागतिक क्रमवारीत त्यानं ७७ व्या स्थानी झेप घेतली आहे. सुमितने आत्तापर्यंतचं मिळवलेलं हे सर्वोच्च स्थान आहे.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या रियासी जिल्ह्यातल्या तेरयाथ या गावाजवळ काल संध्याकाळी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात किमान १० यात्रेकरूंचा मृत्यू झाला आहे, तर ३३ जण जखमी झाले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी परिस्थितीचा आढावा घेतला असून जखमींना मदत करण्याची सूचना नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांना दिली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. केंद्रीय मंत्री अमित शहा आणि राजनाथ सिंह यांनीही या हल्ल्याचा निषेध केला आहे.

दरम्यान, या दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी सुरक्षादलांनी व्यापक शोधमोहीम हाती घेतली आहे.

<><><><><>

फ्रान्सचे प्रधानमंत्री इम्यानुयल मॅक्राँ यांनी काल राष्ट्रीय दूरचित्रवाहिनीवरून देशात मध्यावधी निवडणुकांची घोषणा केली. या निवडणुका येत्या ३० जून आणि ७ जुलै अशा दोन टप्प्यात होतील, अस मॅक्राँ यांनी जाहीर केलं. निवडणूकपूर्व सर्वेक्षणात इम्यानुयल मैक्रॉ यांच्या विरोधी पक्षाला ३२ टक्के मतं  मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली असून ती मैक्रॉ यांच्या रिनसा पक्षापेक्षा दुप्पट आहेत. नुकत्याच झालेल्या युरोपियन संघाच्या निवडणुकीत मैक्रॉ यांचे विरोधक, मरीन ले पेन यांच्या नॅशनल रॅली पार्टीला मोठा विजय मिळण्याची शक्यता मतदानोत्तर चाचण्यांमधे वर्तवण्यात आली आहे.

<><><><><>

नैर्ऋत्य मोसमी पावसाची आगेकूच सुरू असून, काल तो, मध्य अरबी समुद्र आणि उत्तर अरबी समुद्राच्या भागात सक्रीय झाल्याचं  हवामान विभागाने म्हटलं आहे. नैर्ऋत्य मोसमी पावसाने काल महाराष्ट्राच्या अनेक भागात प्रवेश केला असून, मुंबईत साधारणतः ११ जूनला अपेक्षित असणारा  मान्सून, दोन दिवस आधीच दाखल झाला असल्याचं  हवामान खात्याने सांगितलं. काल रात्री पावसाच्या सुखद सरींनी मुंबईकरांना उकाड्यापासून दिलासा दिला. शहराच्या सखल भागात मात्र काही ठिकाणी पाणी साचलं होतं. आज राज्यात पुणे, सातारा, सोलापूर, उस्मानाबाद, लातूर, अहमदनगर, नाशिक, औरंगाबाद, नंदुरबार, जळगाव, धुळे आणि बीड जिल्ह्यात जोरदार पावसाची शक्यता असून हवामान विभागाने या जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट  जारी  केला आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

**//<><><><><>//**